# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

## कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४.

### माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम १८(१) अन्वये तक्रार

### तक्रार क्रमांक : १३५३/२०२२

तक्रारकर्ता, श्री. राहुल यशवंत पवार,
शॉप नं.०१, दामोदर टॉवर मोरया नगर,
मनवेलपाडा रोड, विरार (पु) ४०१ ३०५.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्र.सहा.आयुक्त,
प्रभाग समिती सी, चंदनसार,
वसई विरार शहर महानगरपालिका,
ता.वसई, जि.पालघर ४०१ ३०५.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त,
वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय विरार,
विरार (पू), ता.वसई, जि. पालघर ४०१ ३०५.

<u>विवेचन</u>

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०४.०५.२०२२ | ०१.०६.२०२२ | १६.०६.२०२२ | ०६.०९.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.०७.१०.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली," असे कारण नमूद करुन आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

तक्रारकर्ता यांनी दि. ०४.०५.२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये "वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती-सी, कार्यक्षेत्रात "विकास निधी अंतर्गत रस्ता बांधकाम" या योजनेंतर्गत वर्ष २०१८-१९ ते आजतागायत केलेल्या कामांसंदर्भात नमूद रकान्यात माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी," अशी माहिती मागितलेली आहे.

सदर प्रकरणी उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते की, तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन, *"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांस अभिलेख निरीक्षण पडताळणीकरिता बोलवून निरीक्षण पडताळणी अंती अपेक्षित माहितीच्या प्रती १५ दिवसांत विनामुल्य देण्यात याव्यात,"* असा प्रथम अपील निर्णय दि.०६.०९.२०२२ रोजी पारीत केलेला आहे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल आयोगास सादर करणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आयोगाच्या दि.०२.०३.२०२३ रोजीच्या पत्रानुसार कळविण्यात आले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये आयोगास अहवाल सादर केला असून, सदर अहवालामध्ये *"दि.१५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस निरीक्षण पडताळणी करीता उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. सदर पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थीने कार्यालयात उपस्थित राहून निरीक्षण पडताळणी करून मागितलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य जा.क्र.वविशम/बांध/प्रससी १०३७/२०२२, दि. १९.१०.२०२२ नुसार उपलब्ध करून दिलेली आहे. व*

*अतिरिक्त माहितीची आवश्यकता असल्यास उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. परंतु, अपिलार्थी निरीक्षण पडताळणी करीता आजतागायत कार्यालयात उपस्थित राहिलेले नाहीत,"* असे नमूद केले आहे.

या प्रकरणासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तक्रारकर्ता यांनी विशिष्ट नमुन्यात विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली असून, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना दि.०१.०६.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे की, तक्रारकर्ता यांनी विहित केलेल्या प्रपत्रात माहिती संकलित व तयार करुन देण्याचे माहितीचा अधिकार अधिनियमाच्या तरतूदीस अभिप्रेत नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या निर्णयानंतर तक्रारकर्ता यांना दि.१५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दस्तऐवज निरीक्षण व पडताळणी करीता कळविले असल्याचे दिसून येत आहे. तक्रारकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी मागितलेली माहिती ही त्यांनी स्वत: तयार केलेल्या विशिष्ट स्वरुपाच्या तक्त्यामध्ये मागितलेली आहे. अशा प्रकारे माहिती संकलित करुन देण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमांतर्गत नसल्याने, जन माहिती अधिकारी यांची कार्यवाही योग्य आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ जानेवारी, २०२५.